# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

INDIAN PUBLIC SCHOOLS' CONFERENCE

NABET

## MID-APRIL EXAMINATION 2025-26
### MARATHI

Class : X | Duration : **1** Hrs
Date : 16.04.20245 | Max. Marks : **25**
Admission No.: | Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग – अ (वाचन व आकलन )

**प्रश्न 1 :– (आकलन ) अपठित गद्यांश :–** **(5X1=5)**

वृक्ष जे त्यागाच्या भावनेने स्वतः उन्हात उभे राहतात, पण इतरांना सावली देतात. ज्यांची फळे–फुलेही दुसऱ्यांसाठीच असतात,असे त्यागमय जीवन जगणारे वृक्ष एखादया सत्पुरुषासारखे भासतात. सामान्य माणूसही नेहमीच्या दगदगीपासून दूर जाण्यासाठी,हवापालटासाठी थंड हवेच्या ठिकाणी निसर्गाच्या सान्निध्यातच जातो. अशा या उपकारकर्त्या वृक्षांचा आज ऱ्हास होताना दिसत आहे. मानवाने बेसुमार जंगलतोड करून वैराण वाळवंटे निर्माण केली आहेत. मानवाचे पाऊल नि वाळवंटाची चाहूल अशी म्हण आहे,ती अगदीच त्याने सार्थ केली आहे. जळणासाठी आणि घरे बांधण्यासाठी बेसुमार वृक्षतोड केली. त्यामुळे उष्णता वाढली पावसाचे प्रमाण कमी झाले. दुष्काळाचे प्रमाण वाढले जमिनीची धूप होऊन ती नापीक झाली. परिणामी हवेच्या प्रदूषणासारख्या समस्यांना मानवाला तोंड दयावे लागले जंगलात माणूस जितकी कमीत कमी लुडबूड करेन तितके आपले चक्र दुरुस्त करण्याची निसर्गाला संधी मिळेल. जंगलतोड तर थांबलीच पाहिजेच पण त्याचबरोबर नवीन झाडेही लावली गेली पाहिजेत,जंगले वाढवली पाहिजेत. या सर्व गोष्टींचा विचार करून पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि सर्व लोकांना जंगलाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी प्रयत्न करणे फार महत्त्वाचे आहे

**(अ) दिलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा:–**

1 वृक्षांची फळे–फुले कोणासाठी असतात ?

**अ** इतरांसाठी  **ब** दुसऱ्यांसाठी
**क** स्वतःसाठी  **ड** प्राण्यासाठी

2 मानवाने जंगलतोड करून काय निर्माण केले ?

**अ** हवेचे प्रदूषण  **ब** कमी पाऊस
**क** वैराण वाळवंटे  **ड** नापीक जमीन

**(आ) उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा:–**

1 निसर्गाचे चक्र दुरुस्त करण्याची संधी केव्हा मिळेल?
2 त्यागमय जीवन जगणाऱ्या वृक्षांना लेखकाने कोणती उपमा दिली आहे?
3 बेसुमार वृक्षतोडीमागील कोणती कारणे वरील उताऱ्यात आली आहेत?

## विभाग– ब ( व्याकरण )

**प्रश्न 2 खालील वाक्यांचे प्रकार ओळखा –** **(3X1=3)**

1 सर्वांनी सूचनांचे पालन करावे.
2 अरे देवा! चुकलं की तुझं गणित !
3 कुशलला दिलेली शिक्षा मान्य नाही.(होकारार्थी वाक्य तयार करा )

**प्रश्न 3 समानार्थी शब्द लिहा :–** **(1)**

1 सर्वोच्च

**प्रश्न 4 विरुध्दार्थी शब्द लिहा :–** **(1)**

1 प्रशंसा

**प्रश्न 6 खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करुन पुन्हा लिहाः–** **(4X1=4)**

(गोडी लावणे, उसंत न मिळणे,बरबाद होणे,आक्षेप नोंदविणे)

1 ब्रिटिशांनी अत्यावश्यक वस्तूंवर कर लावल्यावर भारतीय नेत्यांनी त्यावर हरकत घेतली.
2 दिवाळीत आईला कामातून अजिबात वेळ मिळत नाही.
3 अतिवृष्टीमुळे सगळी पिके वाया गेली.
4 हसतखेळत गणित शिकवून जोशी सरांनी मुलांमध्ये गणिताची आवड निर्माण केली.

## विभाग (क) पाठ्पुस्तकावर आधारित

**प्रश्न 1 खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही दोन )** **(2X3=6)**

1 भिक्षेकऱ्याने केलेला शालीचा उपयोग या विषयी तुमचे मत लिहा ?
2 खाली दिलेल्या ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः–

अग्निमाजि पडे बाळू । माता धांवें कनवाळू ।।
तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ।

3 रा. ग. जाधव यांची संवेदनशीलता जाणवणारे कोणतेही एक उदाहरण पाठाच्या आधारे लिहा ?

## विभाग ड ( लेखन )

**प्रश्न 4 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :–** **(1X5=5)**

**1 सैनिकाचे मनोगत –**

**मुद्दे** :सैन्य दलात भरती होण्याचे स्वप्न–– योग्य प्रशिक्षण––सैन्यात भरती–– शत्रूचे भारतीय हद्दीत अतिक्रमण––जोरदार युद्ध––– भारत मातेसाठी प्राणार्पण करण्याची वेळ– शेवटी विजय––जयहिंद .

**2 परीक्षा रद्द झाल्या तर ..........**

**मुद्दे** :– शालेय जीवनातील सुखद क्षण–––मैत्री,दंगा–मस्ती–––अभ्यासात आवड मात्र परीक्षा नको–––रद्द झाल्यास तनावरहित अभ्यास–––उत्तीर्ण–अनुत्तीर्ण तानच नाही–––पण याचे दुष्परिणाम –––परीक्षांचे महत्त्व –––परीक्षा तर हव्यात,मग त्या कशा ?

**:::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::::**